# बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय:- दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी येणा-या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम राबविण्याबाबत

संदर्भ:- परिपत्रक क्रमांक-GAD -४९०२२/९/२०२५- GAD (DESK-२९) दि.१४ फेब्रुवारी २०२५

महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी येणा-या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम राबविण्याबाबत सुचना प्रसिध्द केल्या आहेत.

प्रस्तृत परिपंत्रकाच्या प्रती सर्व खाते प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित करण्यात येत आहेत.

तसेच प्रस्तुत परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in / circular या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सही/-१८.०२.२०२५
( पराग स.धोपटे )
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/-१८.०२.२०२५
(किशोर गांधी)
उप आयुक्त
(सामान्य प्रशासन)

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/१५६/सर्वसा/(एमओपी/४०१)
दिनांक:१८.०२.२०२५

प्रत--------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)

माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

L.L. Cardoza 18/2/25

लिआना लॉ.कार्डोझ
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

18/2/2025

५४५५। १९ फेब्रुवारी रोजी येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम राबविण्याबाबत

प-२

महानगरपालिका आयुक्त
अतिरिक्त आयुक्त (शहर)
महानगरपालिका सचिव

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:GAD-४९०२२/९/२०२५-GAD (DESK-२९)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२५.

संदर्भ:-१) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : GAD-४९०२२/१४/२०२३ - GAD (DESK-२९), दि.२७.१२.२०२३.
२) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-१४२३/प्र.क्र.१२/ कार्या-३१ (राजशिष्टाचार),दि.०१.०२.२०२३
३) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२३/ प्र.क्र.४२/ कार्या-२९, दि.१५.०२.२०२३.
४) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२४/ प्र.क्र.१६/ कार्या-जपुक (२९), दि.०५.०२.२०२४.

प्रस्तावना :

शासनामार्फत दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरी करण्यात येते. दिनांक १९ फेब्रुवारी चे औचित्य साधून या थोरपुरूषांचे ज्या-ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी. तसेच ज्या-ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे/स्मारके आहेत त्या परिसराची पाहणी करून संबंधित यंत्रणांकडून रंगरंगोटी, साफसफाई व सुशोभिकरण करून घेण्यात यावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा सार्वजनिक कार्यक्रम करतांना राज्याच्या राज्य गीताचे गायन करण्यासंदर्भात सन २०२३ व २०२४ मध्ये स्वतंत्ररित्या परिपत्रक निर्गमित करण्यात येत होते. दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येत असल्याने आगामी वर्षासाठी सुचनांचे स्थायी परिपत्रक निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

परिपत्रक :

२. छत्रपती शिवाजी महाराजांची दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी येणाऱ्या जयंतीचे औचित्य साधून या थोरपुरुषांचे ज्या ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे रंगरंगोटी, साफसफाई व सुशोभिकरण करुन घेऊन ते झाल्याची खातरजमा संबंधित विभाग प्रमुख यांनी करुन घ्यावी.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्राच्या राज्यगीताची घोषणा करण्यात आली आहे. सदरच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे

Scanned with OKEN Scanner

अनुपालन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करतांना महाराष्ट्र राज्याच्या राज्य गीताचे गायन करुन सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावे. तद्नंतर छोटेखानी सांस्कृतिक समारंभाचे आयोजन करण्यात यावे.

४. उपरोक्त उल्लेखित उपक्रम यशस्वीरित्या पार पाडावयाचे असल्याने, त्याचे योग्य व काळजीपूर्वक नियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी दिनांक १९ फेब्रुवारी, रोजी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे सर्व बाबींची काटकोरपणे नियोजन करुन अंमलबजावणी करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा सांकेतांक २०२५०२१४१६३२१६०००७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SACHIN RAMESHCHANDRA KAWALE

Digitally signed by SACHIN RAMESHCHANDRA KAWALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=[illegible]a6632fad19eb9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=[illegible]27AEE4A11A35B349E2B7, cn=SACHIN RAMESHCHANDRA KAWALE
Date: 2025.02.14 16:33:09 +05'30'

( सचिन कावळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव (प्र.ना.उ.सु.) (अति.कार्य.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मंत्रालयीन विभाग
   यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शासकीय / निमशासकीय तसेच महाविद्यालये व शाळा यांना सदर परिपत्रकाची प्रभावी तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन देखील सूचना देण्यात याव्यात.
९. सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
११. सर्व विभागीय आयुक्त.
१२. सर्व जिल्हाधिकारी.
१३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१४. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१९. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
२०. निवड नस्ती ( कार्यासन-२९).

18 FEB 2025

एमजीआर | ४०२९



Scanned with OKEN Scanner